This Question Paper consists of 37 questions and 7 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 7 छापील पाने आहेत.

Roll No. अनुक्रमांक

Code No. कोड नं. **52/S/A/M**

Set **A**

# MARATHI
## (मराठी)
## (204)

Day and Date of Examination (परीक्षेचा दिवस आणि तारीख) ______________________

Signature of Invigilators (निरीक्षकाची सही)
1. ______________________
2. ______________________

**सामान्य अनुदेश :**

1. परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.
2. कृपा करून प्रश्न–पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रुपात असावी.
3. बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायातून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यात येणाऱ्या उत्तर–पुस्तिकांमध्ये योग्य उत्तर लिहायचे आहे.
4. बहुपर्यायी प्रश्नांचे सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यात येणार नाही.
5. उत्तर–पत्रिकेत ओळख निदर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यात येईल.
6. आपल्या उत्तर–पत्रिकांवर प्रश्न–पत्रिकेचा कोड संख्या **52/S/A/M-A** लिहावेत.

# MARATHI

# (मराठी)

# (204)

**वेळ : 3 तास** **एकूण गुण : 100**

---

**निर्देश :**

1. **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2. **सर्व** प्रश्न लक्षपूर्वक वाचून मगच प्रश्नाचे उत्तर द्यावे.
3. प्रश्न **1** ते **11** पर्यंत प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून लिहावा.

---

**1.** झेल्या कुणाचा मुलगा होता? **1**

(A) लोहार (B) सुतार (C) डॉक्टर (D) मिस्त्री

**2.** सुशिक्षितांना केसरी पत्र चालणार नाही, असे टिळकांना वाटले कारण : **1**

(A) केसरी पत्र आठवड्यातून दोनदाच काढले जाई.

(B) ते निव्वळ मराठीत काढले होते.

(C) केसरी पत्राची भाषा अवघड होती.

(D) केसरी पत्र इंग्रजीतून काढले होते.

**3.** योग्य पर्याय भरून वाक्य पूर्ण करा. **1**

'जगतास _ _ _ _ _ _ _ _ _ _ देईल.

(A) मुक्ति (B) शांती (C) क्रांती (D) सेवा

**4.** ''ने मजसी ने परत मातृभूमिला'' असे कवी कोणाला उद्देशून म्हणतो? **1**

(A) सागराला (B) ईश्वराला (C) शिपायाला (D) मित्राला

**5.** 'श्रावणमास' या कवितेत कशाचे वर्णन केले आहे? **1**

(A) निसर्गाचे (B) राष्ट्राचे (C) शाळेचे (D) युद्धाचे

**6.** उत्पादन कोण करू शकतो? **1**

(A) उद्योजक (B) ब्रह्मदेव (C) कामगार (D) तंत्रज्ञ

**7.** साधु पुरुष कोणाला म्हणावे? **1**

(A) रंजल्या गांजलेल्यांना आपले म्हणणारा (B) सतत नामस्मरण करणाऱ्याला

(C) पूजा जपादि करणाऱ्यास (D) भगवी वस्त्रे घालणाऱ्यास

**8.** नागू गवळी कसा होता? **1**

(A) प्रेमळ (B) चपळ (C) कामसू (D) झोपाळू

**9.** देशात सगळ्यात मोठे धन कोणते? **1**

(A) पैसा (B) शस्त्रास्त्र (C) मुले (D) प्रदेश

**10.** शुद्ध शब्द कोणता? **1**

(A) उद्धरणी (B) उधरणी (C) उदधरणी (D) उध्दरणी

**11.** खालीलपैकी कोणत्या वाक्यात केवलप्रयोगी अव्यय आले आहे? **1**

(A) पक्षी सुंदर दिसत होते.

(B) काही पक्षी पिंपळाच्या झाडावर बसले.

(C) काही पक्षांनी आकाशात निरनिराळे आकार बनवले.

(D) अहाहा! किती सुंदर दिसत होत्या त्या पक्षांच्या रांगा.

**12.** डोंबारी स्त्रियांची तुलना लेखकाने इतिहासातील कोणत्या स्त्री बरोबर केली आहे? **1**

**13.** नामस्मरणाने भक्त प्रल्हादास काय मिळाले? **1**

**14.** भागवत धर्माच्या मंदिराचा पाया कुणी घातला? **1**

**15.** डॉ. हेडगेवार कोण होते? त्यांनी कोणते महान कार्य केले? **1**

**16.** डॉ. भीमराव आंबेडकरांना दलित समाज काय म्हणून संबोधतो? **1**

**17.** ''सागरा प्राण तळमळला'' – कवीचे प्राण कशासाठी तळमळतात? **1**

**18.** कंदील फुटून जखम झाल्यावरही टिळक कसे वागले? **1**

**19.** तरुणपणी लेखकास (वि.स. खांडेकर) 'श्री' चे महत्त्व कसे कळून आले? **1**

**20.** 'पाऊल चिन्हे' ही कविता कुणी रचली? कवितेची मध्यवर्ती कल्पना काय आहे? **1**

**21.** खालीलपैकी एका वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा : **1**

(i) थेंबे थेंबे तळे साचे

(ii) नाचता येईना आंगण वाकडे

**22.** खालील वाक्यातील क्रियापद ओळखा व त्याचा काळ कोणता आहे ते सांगा : **1**

(i) तो आईला पत्र लिहीत होता.

(ii) पेट्रोलची किंमत उद्या वाढेल.

**23.** (अ) खालील शब्दांचे प्रत्येकी दोन–दोन समानार्थी शब्द लिहा : **2**

(i) पाणी

(ii) आकाश

(ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : **2**

(i) खरा

(ii) स्वच्छ

(iii) वाईट

(iv) उंच

**24.** खालील उतारा लक्षपूर्वक वाचा व त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :

पुण्याचा गणपती उत्सव फार प्रसिद्ध, वर्तमानपत्रात, दूरदर्शनवर आणि आकाशवाणीवर या गणपती उत्सवाविषयी इतके वाचायला, पाहायला आणि ऐकायाला मिळते की हा उत्सव पाहायला एकदा तरी पुण्याला गेलेच पाहिजे, असे दरवर्षी ठरवतो. पण आजपर्यंत कधीच जमले नाही ते यावर्षी मात्र अगदी निश्चयच केला की जायचेच आणि खरोखरच गणेशचतुर्थीला पुण्याला जाऊन आलो. सगळ्यांच्या घरी गणपती असतातच. पण सार्वजनिक गणपती उत्सव करणारी मंडळे आणि त्यांचे चौकांचौकातील गणपती हे खास पुण्यनगरीचे वैशिष्ट्य. मंडळाचे कार्यकर्ते एकत्र येऊन झटून कामाला लागतात आणि चौकाचौकात गणपती बसवून सर्व कार्यक्रम यशस्वी करतात. कोणाचे व्याख्यान, करमणुकीचे कार्यक्रम, तर कुठे वेगळ्या स्पर्धा. सगळे कार्यक्रम या चौकातच रस्त्यावर होतात पण कोणालाच त्याची अडचण वाटत नाही. रहदारीला अडथळा झाला तरी ते 8 - 10 दिवस कोणीच फारसे मनावर घेत नाही. कारण हे गणपती लोकांचेच असतात ना?

**प्रश्न :**

(i) लेखकाच्या मते पुण्यनगरीचे वैशिष्ट्य काय? **1**

(ii) सार्वजनिक उत्सवात काय–काय कार्यक्रम असतात? **1**

(iii) पुण्यात गणपती उत्सव इतके यशस्वी होण्याचे कारण काय? **1**

(iv) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. **1**

**25.** खालील काव्यांश लक्षपूर्वक वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतःच्या शब्दात लिहा :

संतांचा अनुभव संतचि जाणती।
येर ते हासति अभाविक।।१।।
नामाचा प्रताप प्रल्हादचि जाणे।
जन्म मरण येणे खुंटविले।।२।।
सेवेचा प्रकार जाणे हनुमंत।
तेणे सीताकांत सुखी केला।।३।।
सख्यत्त्वे पूर्णता अर्जुना बाणली।
ऐक्य रूपे चाली मिरविला।।४।।
चोखा म्हणे ऐसा आहे श्रेष्ठाचार।
तेथे मी पामर काय वानू।।५।।

**प्रश्न :**

(i) नामस्मरणाने भक्त प्रल्हादास काय मिळाले? **1**

(ii) सीताकान्त म्हणजे कोण? **1**

(iii) संत चोखामेळा अभाविकांविषयी काय म्हणतात? उदाहरण देऊन सांगा. **2**

26. (अ) मास्तरांनी झेल्यास आपली आठवण म्हणून कोणकोणत्या वस्तू दिल्या? 2

(ब) टिळकांच्या मते आपल्या भाषेवर आपले प्रेम कां असते? 2

27. (अ) ज्योतिबांनी शेतकऱ्यांची कोणती दु:खे सांगितली आहेत? 3

(ब) डॉ. अब्दुल कलाम कोणते आवाहन करतात? 3

28. (अ) पुढील वाक्याचे संदर्भ स्पष्टीकरण करा – 3

''इथे मात्र एकलव्याची आराधना एकनिष्ठेने सुरू आहे''.

(ब) भारताच्या अगदी दक्षिण टोकावर उभे राहिल्यानंतर लेखकाच्या मनात कोणते विचार आले? 3

29. (अ) डॉ. हेडगेवार हे जन्मजात देशभक्त होते, असे कां म्हटले आहे? 2

(ब) ''संभाजीरावांना पत्र'' हे काव्य कुणी लिहिले आहे? त्या मागचा त्यांचा उद्देश काय आहे ते सांगा. 2

30. (अ) आपल्या जगण्यावर प्रेम करावे असे कवीला का वाटते? कवितेचे व कवीचे नाव लिहा. 3

(ब) खालील काव्यपंक्तीचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा. 3

''तुका झालासे कळस। भजन करा सावकाश,
बहिणी म्हणे फडकती ध्वजा। निरूपणा केले बोजा''.

31. (अ) समाज कंटकांनी महर्षी कर्वे यांचा छळ कां व कसा केला? 3

(ब) खालील काव्यपंक्तींचा ससंदर्भ अर्थ स्पष्ट करा. 3

''वैभवी देश चढवीन
स्वातंत्र्य त्यासि अर्पीन
हा तिमिर घोर संहारिन
या बंधू साहाय्याला हो। बलसागर भारत होवो''.

32. वर्गात उशीरा पोहचलेला विद्यार्थी व वर्गशिक्षक यांच्यातील संवाद आठ ते दहा ओळीत लिहा. 4

33. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा – 10

(शब्द मर्यादा **200**)

(i) आजचा विद्यार्थी

(ii) मी केलेला प्रवास

(iii) वृक्षाचे आत्मवृत्त

(iv) मोबाईलचे फायदे तोटे

**34.** तुम्हाला या पाठ्यपुस्तकातील सर्वात अधिक कोणता पाठ आवडला? कां? त्या पाठाचे व लेखकाचे नाव सांगा. **4**

**35.** पत्र लेखनाचे नियम कटाक्षाने पाळून खालीलपैकी एका विषयावर पत्र लिहा : **8**

(i) दिल्लीचे बदललेले स्वरूप पाहण्यासाठी तुमच्या मित्रास सुट्टीत आमंत्रित करण्यासाठी पत्र लिहा.

(ii) परीक्षेच्या दिवसात वीजप्रवाह वारंवार खंडित होत असल्यामुळे तुमचा अभ्यास नीट होत नाही त्याविषयी तक्रार करणारे पत्र विद्युतमंडळाच्या अधिकाऱ्याला लिहा.

**36.** खालील उतारा लक्षपूर्वक वाचा. त्याचे स्वतःच्या शब्दांत एक तृतीयांश सारांश लेखन करा, व योग्य शीर्षक ही द्या. **4**

राष्ट्रीय शिक्षण हा राष्ट्राचा प्रश्न आहे. राजशासनाच्या ग्रंथात लोकशिक्षण हा एक राजधर्म सांगितला आहे. प्राचीन काळी हे काम राजाच्या अवश्य कर्तव्यांपैकी होते की नव्हते ते मला सांगता येत नाही. अलीकडील भूतकाळी तरी आमच्या देशाचे राजे लोकशिक्षणाचे काम स्वतःच्या धर्म कर्मा पैकी एक समजत नव्हते असे वाटते. मुसलमानी रियासतीत किंवा मराठा रियासतीत लोकशिक्षणाची बाब सरकारी बाबींपैकी होती असे इतिहासाने नमूद केलेले माझ्या वाचनात नाही. प्राचीन काळीही निरनिराळ्या मठांतून व आश्रमांतून अध्ययन चाले. त्या त्या मठाधिपतीस किंवा ऋषीस राजाचा आश्रय असला तर तो लोकशिक्षण हा एक राजधर्म आहे असे समजून असे, असे म्हणता येईल की नाही कोण जाणे. ते कसेही असो; अलीकडे पाश्चिमात्य राजशास्त्र विवेचकांनी राजा आणि प्रजा यातील संबंधाचे जे स्वरूप ठरविले आहे त्याप्रमाणे लोकशिक्षण हे राजाच्या कामापैकी एक ठरले आहे.

**37.** खालील माहितीच्या आधारे वृक्षालेख तयार करा – **4**

बाळाजी विश्वनाथ पेशवे यांना दोन मुले होती. चिमाजी व पहिला बाजीराव. चिमाजीचा मुलगा सदाशिव तर पहिल्या बाजीरावांचे मुले बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब व रघुनाथराव, नानासाहेबांची मुले विश्वासराव, माधवराव व नारायणराव तर रघुनाथरावांचा मुलगा दुसरा बाजीराव.

**- o O o -**